# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 116 /शि.वि./२०१६
दि. ०१/०१/२०१६

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :-** २६ जानेवारी २०१६ रोजी गणराज्य दिन सोहळयाचे आयोजन करण्याबाबत.

**संदर्भ :-** मा. अपर आयुक्त, म.न.पा., नागपूर यांचे पत्र क्र.साप्रवि/४५/परि दि. १६.०१.२०१६ चे अन्वये.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, दि.२६ जानेवारी २०१६ रोजी स्वतंत्र भारताचा प्रजासत्ताक दिनाचा ६६ वा वर्धापन दिन आहे. या राष्ट्रीय सनानिमीत्त आपल्या शाळेत रंगरंगोटी व स्वच्छता करुन परिसर सुशोभित करावा. सकाळी ६ ते ७ दरम्यान प्रभातफेरी काढून स्वातंत्र संग्रामाच्या उज्वल परंपरेस उजाळा देण्यात यावा. शाळेमध्ये ध्वजारोहन समारंभ व त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे. या कार्यक्रमास आपल्या परीसरातील मा.नगरसेवक, शाळा समिती पदाधिकारी, गणमान्य व्यक्ती व पालक यांना आमंत्रित करावे. कार्यक्रमानंतर मनपा तर्फे पुरविण्यात आलेला खाऊ वितरीत करावा. विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात यावे. कार्यक्रमाचा अहवाल व फोटो आपल्या झोनचे शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर